MHSO130008222025

नियमित दिवाणी दावा क्र.६९१/२०२५
अभिमन्यु वि. भिष्माचार्य व इतर

# निशाणी क्र.५ वर आदेश

वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांच्याविरुध्द प्रतिवादींनी दावा मिळकतीवर अतिक्रमण करुन चालु केलेले बांधकाम बंद करण्याबाबत तसेच निरंतरच्या मनाई हुकूमाकरीता दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज हा तात्पुरत्या मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी केली आहे. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या मालकीची ग्रामपंचायत मिळकत क्र.२० ही दावा मिळकतीच्या पुर्व बाजुस असुन प्रतिवादी यांनी दावा मिळकतीवर अतिक्रमण करुन आर.सी.सी. चे बेकायदेशीर बांधकाम चालु करुन ४ ते ५ फुट उंचीच्या भिंती बांधलेल्या आहेत. सदरच्या बांधकामाचे खांब हे वादीच्या घरासमोर दरवाजात उभे करुन बांधकाम चालु केलेले आहे. त्यामुळे वादीचा पुर्वेकडील रस्ता पुर्णतः बंद झालेला आहे. सबब, वादीने प्रस्तुतचा दावा हा सदरील बांधकाम बंद करुन प्रतिवादी यांनी केलेले बांधकाम त्वरीत काढुन घेणेबाबत तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

२] वादीने अभिलेखावर दावा मिळकतीचा उतारा, नमुना नं.८ चा उतारा, वादी यांनी ग्रामसेवक, गट विकास अधिकारी तसेच पोलीस निरीक्षक यांच्याकडे दिलेले तक्रार अर्ज तसेच दावा मिळकतीचे छायाचित्र दाखल केलेले आहेत. दाव्यामध्ये व तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जामध्ये केलेल्या कथनानुसार प्रतिवादी यांनी वादी यांच्या दावा मिळकतीच्या पुर्व बाजुस असलेला दरवाजा हा आर.सी.सी. चे खांब तसेच ४ ते ५ फुट भिंती बांधुन बंद करण्याचा प्रयत्न ते करत आहेत. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी हे त्यांच्या मिळकतीच्या पुर्व बाजुचे मालमत्ता धारक आहेत. दाव्याचे स्वरुप तसेच वादी यांनी केलेली मागणी पाहता प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये प्रतिवादी यांना ऐकुन न घेता त्यांच्याविरुध्द एकतर्फा मनाई आदेश पारीत करणे योग्य होणार नाही. सबब, प्रतिवादी यांना त्यांच्या विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश का पारीत करु नये अशा आशयाची कारणे दाखवा नोटीस परतीची दिनांक १६/०९/२०२५ काढण्यात यावी. विषेश बेलीफ व तात्काळ प्रोसेस आवश्यक असल्यास मंजुर करण्यात येते.

Digitally signed by PADMASHRI VASANT RAUT
Date: 2025.09.09 17:59:30 +0530

बार्शी.
दिनांक ०९/०९/२०२५

( श्रीमती पी.व्ही. राऊत )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बार्शी.

# <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Shri.S.R. Barangule |
| (b) | Court | : | Smt. P.V. Raut,<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 09/09/2025 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 09/09/2025 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 09/09/2025 |